ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २५ फेब्रुवारी, १९५९ | अंक ८

## विविध माहिती

**रशिअन भाषेचा अभ्यास**—अन्नमलायी विद्यापीठांतील भाषाविभागातर्फे रशियन भाषेचे प्राथमिक धडे देणारा अभ्यास-क्रम सुरू करण्यांत आला आहे. परभाषा शिकविणारे विद्यापीठाचे रीडर म्हणाले कीं, ज्या विद्यार्थ्यांना शास्त्रें अगर सांस्कृतिक विषय शिकावयाचे आहेत त्यांच्या दृष्टीनें रशिअन भाषा फार महत्त्वाची आहे.

**जागतिक बँकेचें धोरण**—जागतिक बँकेच्या निधींत लवकरच वाढ होणार असली तरी बँक सढळ हातानें कर्जे देईल असें मात्र नाहीं. सध्यां बँकेजवळ ९० कोटी डॉलर्सचा निधी आहे. बँकेच्या सभासदांनीं आपली वाढलेली वर्गणी दिली म्हणजे हा निधी २५० कोटी डॉलर्स होईल. कोणत्याहि देशाच्या आर्थिक मगदुरापेक्षा अधिक रक्कम देण्यांत येणार नाहीं.

**केळयाच्या भुकटीचा कारखाना**—जळगांव येथें केळयाची भुकटी तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येण्याचा संभव आहे. पूर्व खानदेशांतील विविध सहकारी संस्थांतर्फे भांडवल पुरविण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी ५ लाख रुपयांची यंत्र-सामुग्री लागेल आणि अशा प्रकारचा भारतामधील हा पहिलाच कारखाना असेल.

**शेतकऱ्यांचा संप फसला**—उत्तरप्रदेशांतील शेतकऱ्यांच्या संघटनेनें उसाचे भाव वाढवून मिळण्यासाठी साखर कारखान्यांना ऊंस पुरविण्याचें बंद केलें होतें. परंतु शेतकऱ्यांचा हा संप फसला आहे. एकूण ६६ साखर कारखान्यांपैकी पांच कारखानेच बंद पडले व १८ कारखाने अर्धवट बंद पडले. नंतर म्हणजे आठ तारखेपर्यंत एक कारखाना सोडून बाकीचे सर्व चालू झाले.

**रशिआच्या मदतीनें औषधाचा कारखाना**—रशिआच्या मदतीनें काढण्यांत यावयाच्या औषधाच्या कारखान्यासंबंधीं बोलणीं करण्याकरतां दोन वरिष्ठ अधिकारी लवकरच मॉस्कोला जात आहेत. १९५८ मध्यें आलेल्या रशिअन तज्ज्ञांनीं आपला एतद्विषयक अहवाल मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. कारखान्यासाठी २८ कोटी रुपये खर्च येईल.

**साप्ताहिकाला सुवासिक मुखपृष्ठ**—जपानमधील एका साप्ताहिकानें आपल्या अंकांना सुवासिक मुखपृष्ठ वापरण्यास सुरवात केली आहे. मुखपृष्ठावर तांबड्या गुलाबाचें मोठें चित्र छापण्यांत आलें आहे. मुखपृष्ठ छापतांना कांहीं खास शाईचें मिश्रण करून वास निर्माण करण्यांत आला आहे. हा वास सहा महिने टिकेल, असें सांगण्यांत येत आहे.

**गृहविज्ञान परिषद्**—दिल्ली येथें गृहविज्ञान परिषदेचें अधिवेशन भरलें होतें. गृहविज्ञानाचें शिक्षण देणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांच्या गरजा भागविण्यासाठी भारतांत चार विभागीय संस्था स्थापन करण्यांत याव्यात अशी सूचना परिषदेनें केली आहे. ह्या शास्त्राचें शिक्षण देणारे शिक्षक शिकवून तयार करण्याच्या आवश्यकतेवर परिषदेंत भर देण्यांत आला.

**बोस्टन येथील डॉक्टरांचा प्रयोग**—बोस्टन येथील डॉक्टरांनीं एका कुत्र्याचें हृदय शून्य उष्णतामानाच्याहि खाली गोठविलें व नंतर तें दुसऱ्या कुत्र्याच्या छातींत बसवून चालू करण्यांत यश मिळविलें. पण कुत्र्याच्या बाबतींत यशस्वी झालेलें त्यांचें तंत्र मानवी इंद्रियांच्या बाबतींत अयशस्वी ठरलें. मानवी इंद्रियें इतकीं गोठविलीं तर तीं कायमचीं निकामी होतात, असें आढळून आलें.

**दिग्बाई तेलखाणींचें उत्पादन**—आसाम ऑइल कंपनीच्या दिग्बाई येथील तेलाच्या खाणींतून गेल्या वर्षी ११·४ कोटी गॅलन तेल उपसण्यांत आलें. त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा हें उत्पादन १·० लाख गॅलननें जास्त आहे. भारतामधील अशुद्ध तेलाचा उपयोग करून त्यापासून तेल निर्माण करणारा हा एकच कारखाना आहे. गेल्या अकरा वर्षांत ह्या कारखान्यानें ९१ कोटी गॅलन तेल भारताला दिलें.

**घरबांधणीसाठी कर्जें**—मध्यम उत्पन्नाच्या गटांतील लोकांना घरें बांधण्यासाठी कर्जें देण्याचें आयुर्विमा कॉर्पोरेशननें ठरविलें आहे, अशी माहिती लोकसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आली. ह्या योजनेप्रमाणें दरसाल तीन कोटी रुपयांचीं कर्जें देण्यांत येतील. मात्र सध्यां तरी कर्जें देण्याची ही योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंतच अंमलांत आणण्यांत येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**पॉल रॉबसन् ह्यांची भूमिका**—प्रसिद्ध निग्रो गायक व नट मि. पॉल रॉबसन् मॉस्को येथें एकाएकीं आजारी पडल्यामुळें ठरल्याप्रमाणें भारतांत येऊं शकले नाहींत. आतां त्यांची प्रकृति सुधारली असून ते मॉस्को येथील आरोग्यधामांत विश्रांति घेत आहेत. ब्रिटनमध्यें शेक्सपिअरच्या स्मरणार्थ होणाऱ्या 'ऑथेल्लो' ह्या नाटकांत ते ऑथेल्लोची भूमिका करणार आहेत.

**सिमेंटच्या कारखान्याची यंत्रसामुग्री**—भारतांत सिमेंट च्या कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्यासाठी लागणारा परवाना देण्यांत आलेले सहा कारखाने आहेत. त्यांनीं गेल्या वर्षी ६५ लाख रुपयांची यंत्रसामुग्री तयार केली. अजून सर्व यंत्रसामुग्री मात्र तयार होऊं लागलेली नाहीं. कांहीं भाग परदेशांतून आयात करावे लागतात.

**सायकल प्रवाशांना भेट**—जर्मनीमधील एक व फ्रान्स-मधील एक असे दोन सायकल-प्रवासी जगाच्या पर्यटनास निघाले आहेत. त्यांची गांठ प्रथम ग्रीसमध्यें पडली. जगांतील लोकांचा अभ्यास करण्याचा त्यांचा इरादा आहे. मुंबईमधील हिंद सायकल कंपनीनें दोघांना नव्या सायकली भेटीदाखल दिल्या आहेत.

**मोटारींच्या टायर्सचा कारखाना**— मद्रासपासून १० मैलांवर अंबातूर ह्या ठिकाणीं डनलॉप रबर कंपनीनें मोटार व सायकली ह्यांच्या टायर्स तयार करण्याचा कारखाना स्थापन केला आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री अद्यावत् असून त्यासाठी २॥ कोटी रुपये भांडवल लागलें आहे. कारखान्याचा विस्तार ३० एकर जागेवर पसरलेला आहे.

**भोगावती साखर कारखाना सुरू**—कोल्हापूर जिल्ह्यांतील भोगावती सहकारी साखर कारखान्यांत उत्पादनास नुकताच प्रारंभ करण्यांत आला. हा कारखाना दररोज जास्तींत जास्त १,२०० पोतीं साखर उत्पादन करूं शकेल. कोल्हापूर जिल्ह्यांतील आणखी दोन सहकारी कारखाने उभारण्याचें काम पूर्ण होत आलें असून तेंहि लवकरच उत्पादनास प्रारंभ करतील.

**विद्यापीठाचें इस्पितळ**—गुजरात विद्यापीठ एक इस्पितळ व जीं आरोग्य केंद्रें आपल्या आवारांत स्थापन करणार आहे, ह्या कामासाठी विद्यापीठ अनुदान मंडळानें १ लाख रुपये मंजूर केले आहेत. अहमदाबादमधील बियाणांच्या व्यापाऱ्यांनीं २ लाख रुपये द्यावयाचें कबूल केलें असून खुद्द विद्यापीठ १ लाख रुपयांची तरतूद करणार आहे.

**सुताची सहकारी गिरणी**—झालवाड जिल्ह्यांतील लिंबडी ह्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक सुताची गिरणी उभारण्यांत आली आहे. मुंबई राज्यांतील अशाप्रकारची ही पहिलीच गिरणी आहे. गिरणीच्या उभारणीसाठी ४५ लाख रुपये भांडवल लागलें आहे. गिरणींत तयार होणाऱ्या सुतामुळें १५,००० हातमाग कामगारांची चांगली सोय होईल.

**दोन नवीं वैद्यकीय कॉलेजें**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मध्यप्रदेश राज्यांत दोन नवीं मेडिकल कॉलेजें काढण्यांत येणार आहेत. पैकी एक रायपूर येथें व दुसरें रेवा येथें स्थापन करण्यांत येईल. प्रत्येक कॉलेजसाठी ५ लाख रुपये लागतील. नवीं कॉलेजें स्थापन झालीं म्हणजे राज्यांतील वैद्यकीय कॉलेजांची संख्या ६ होईल.



५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्याची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाव्.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २५ फेब्रुवारी, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कुटुंबनियोजनासंबंधीं खेड्यांतील अनुभव

दिल्ली येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय कुटुंबनियोजन परिषदेपुढें डॉ. एस. चंद्रशेखर ह्यांनीं एक निबंध वाचून दाखविला. मद्रास राज्यांत तीन वर्षांपूर्वी लोकसंख्याविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक संस्था काढण्यांत आली. ह्या संस्थेचे डायरेक्टर म्हणून डॉ. चंद्रशेखर काम करीत आहेत. मद्रास राज्यांतील चिंगलपुट जिल्ह्यांतील एका खेड्यांत संस्थेतर्फे कुटुंबनियोजनाविषयीं सल्ला देणारें केंद्र स्थापन करण्यांत आलें. केंद्र चालवितांना डॉ. चंद्रशेखर ह्यांना जे अनुभव आले, त्यांच्या आधारावर त्यांनीं वरील निबंध तयार केला होता. ह्या अनुभवावरून असें दिसून येतें कीं, भारताच्या ग्रामीण भागांत रहाणाऱ्या लोकांतसुद्धां कुटुंबनियोजनाचा प्रसार यशस्वी रीत्या करणें शक्य आहे, इतकेंच नव्हें, तर ग्रामीण भागांतील लोकांचा ह्या बाबतींतील सनातनीपणा घालविणेंहि शक्य आहे.

केंद्रानें प्रथम एका खेड्यांतील व त्याच्या आसपास पसरलेल्या वस्त्यांतील लोकांची खानेसुमारी केली. ही खानेसुमारी १ जानेवारी १९५६ रोजीं करण्यांत आली. त्यावेळीं असें आढळून आलें कीं खानेसुमारीच्या भागांत १५ ते ४५ ह्या वयाच्या दरम्यानच्या लग्न झालेल्या ६७३ स्त्रिया होत्या. हळुहळु केंद्रांत काम करणाऱ्या लोकांनीं ह्या स्त्रियांच्या भेटी घेण्यास प्रारंभ केला. त्यांपैकी ६३२ स्त्रियांनीं केंद्रावर येण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें त्या आल्या. ह्या स्त्रियांना त्यांच्या कुटुंबांतील माणसांची संख्या मर्यादित करण्याचें महत्त्व पटवून देण्यांत आलें. कुटुंब मर्यादित करण्यासंबंधींचीं कारणें म्हणून त्यांनीं दोन गोष्टी सांगितल्या. पहिलें कारण असें कीं आणखी मूल होणें आर्थिक दृष्ट्या परवडणारें नव्हतें; आणि दुसरें असें कीं त्यांच्यापैकी कांहीं जणींची प्रकृति मूल होण्यासारखी निरोगी नव्हती. नंतर ह्या स्त्रियांना होणाऱ्या प्रजेवर लक्ष ठेवण्यांत आलें. १९२ स्त्रियांना त्यांनीं कृत्रिम संततिप्रतिबंधक उपाय न वापरल्यामुळें गर्भधारणा झाली. ८३ स्त्रियांना प्रतिबंधक साधनें वापरणें अडचणीचें आणि मनस्तापाचें वाटलें. ६३ जणींची अशी समजूत झाली कीं, असे उपाय वापरल्यास त्यांना कधींच मूल होणार नाहीं. १७ स्त्रियांच्या नवऱ्यांनीं साधनें वापरण्यास हरकत घेतली तर ४ प्रकरणांत सासूबाईंनीं विरोध केला. फक्त ४ स्त्रियांनीं आपलें मत बदलून आणखी मुलें व्हावीत अशी इच्छा प्रदर्शित केली. डॉ. चंद्रशेखर ह्यांच्या मतानें केंद्रांत जमा झालेल्या माहितीवरून संशयातीत असे निष्कर्ष काढतां येणार नाहींत. त्यासाठी पांच वर्षांच्या अखेरीस जननाचें प्रमाण अजमावण्यांत आलें पाहिजे. केंद्रानें केलेल्या निरीक्षणाचा काळ जास्तींत जास्त दोन वर्षांचाच होता. त्यांच्या मतानें मद्रास राज्यांतील हें खेडें भारतामधील प्रातिनिधिक खेडें समजण्यास हरकत नाहीं. खेड्यांतील लोकांची कुटुंबनियोजनाविषयींची वृत्ति अभ्यासतां असें आढळून आलें कीं, ७२ टक्के जोडप्यांना फार मुलें नको होतीं. ५५ टक्के नवऱ्यांना व ५८ टक्के स्त्रियांना कृत्रिम साधनें वापरून संततिनियमन करणें संमत होतें. ह्या विषयासंबंधीं चर्चा करतांना असें दिसून आलें कीं, बहुतेक खेडुतांना ह्या विषयासंबंधीं कांहींहि माहिती नव्हती. पण त्याचबरोबर सत्य कळलें तर आपल्याला काय फायदा होईल त जाणून घेण्याची मात्र इच्छा होती. भारतामधील खेड्यांची सांस्कृतिक व आर्थिक पार्श्वभूमि लक्षांत घेतां पुरुषांवरील अगर स्त्रियांवरील शस्त्रक्रियाच परिणामकारक ठरेल असे त्यांचें मत आहे. त्यांतहि पुरुषांवरील शस्त्रक्रिया अधिक सोपी असल्यानें तिला प्राधान्य देण्यांत यावें, अशी सूचना त्यांनीं केली आहे.

---

## बंद पडणाऱ्या कापडाच्या गिरण्यांविषयींचें धोरण

मध्यवर्ती सरकारचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. लाल बहादूर शास्त्री ह्यांनीं लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना, बंद पडणाऱ्या कापडाच्या गिरण्यांसंबंधीं सरकारच्या धोरणाचा खुलासा केला आहे. ते म्हणाले कीं, कापडाच्या गिरण्या बंद कां पडतात ह्याचा अभ्यास सरकार करील आणि त्या चालू करणें आर्थिकदृष्ट्या परवडणारें असेल तर राज्य–सरकारांनीं त्या चालविण्यासाठी घ्याव्यात असे प्रयत्न करण्यांत येतील. तथापि ह्या बाबतींतील प्रयत्नांनाहि कांहीं मर्यादा आहेत. देशांत असणाऱ्या ४७० गिरण्यांपैकी ३४ गिरण्या बंद पडलेल्या आहेत. पण त्या सर्वच चालविण्यासाठी घेण्याचें सरकारला जमणार नाहीं. तरीपण ३४ बंद पडलेल्या गिरण्यांपैकी १८ पुन्हां चालू करण्यांत आल्या आहेत. बंद पडलेल्या प्रत्येक गिरणीची परिस्थिति तपासून पहाण्यासाठी टेक्सटाईल कमिशनरला सांगण्यांत आलें आहे. जरूर तर कमिशनरच्या हाताखालील संघटना अधिक मजबूत करण्यांत येईल. सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं गिरण्या बंद पडण्याचीं तीन कारणें आहेत : (१) पैसा नसल्यामुळें गिरणीच्या जुन्या यंत्रसामुग्रीच्या जागीं नवी यंत्रसामुग्री बसवितां येत नाहीं, (२) गिरणीच्या कारभारांतील बखेडे आणि (३) गैरकारभार. पहिलें कारण यंत्रसामुग्रीसाठीं कर्जाची व्यवस्था करून नाहींसें करतां येण्यासारखें आहे. पण गिरण्यांना खेळतें भांडवल पुरविण्याची सोय अर्थातच करतां येणार नाहीं. बंद पडलेल्या गिरण्या कामगारांच्या सहकारी संस्थांकडे चालविण्यासाठीं देण्याच्या मार्गांत अडचणी आहेत. दोन गिरण्यांतील कामगार वेतन–कपात करून गिरण्या चालविण्यास तयार होते. पण ह्या अटीवर गिरण्या घेऊं नका, असा सल्ला त्यांच्या मध्यवर्ती संघटनेनें दिला.

---

**परदेशीय वकिलातींचा खर्च**—भारतानें निरनिराळ्या देशांत आपले वकील अगर राजदूत ठेवलेले आहेत. ह्या वकिलातींवर फार खर्च होतो अशी तक्रार करण्यांत येत असते. १९५८ च्या डिसेंबर अखेर वकिलाती व त्यांतील नोकरवर्ग ह्यांच्यावर करण्यांत येणाऱ्या खर्चांत ३२लाख रुपये बचत करण्यांत आली.

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २

### १९५७-५८ चा अहवाल

अहवालाचे वर्षी कंपनीचें उसाचें दर एकरीं प्रमाण ५९ टन पडलें व साखरेचा सरासरी उतारा शेंकडा ११ मिळाला.

दि. १-७-१९५८ रोजीं उसाचें क्षेत्र २००० एकर (आडसाली १२०० एकर, सुरू ४०० एकर आणि खोडवा ४०० एकर) होतें. त्यापैकी सुमारें १०० एकर १९५९-६० या वर्षात गळितासाठी येणाऱ्या उंसाचे बेण्यासाठी लागला. अहवालाचे वर्षी कंपनीचा एकूण १,११,९७०-३७ टन ऊंस व बागाईतदारांकडून खरेदी केलेला ६२,९७६-५८ टन ऊंस गाळण्यांत आला व साखरेचें एकूण उत्पादन १,९०,३५१ पोतीं झालें. गतवर्षी साखरेचें एकूण उत्पादन १,८१,४७४ पोतीं झालें होतें.

सिंडिकेटनें लक्ष्मी-नारायण शेतकी संघाचे भागीदार व मयत भागीदाराचे वारसाविरुद्ध दाव्यांतील उभय पक्षकारांचे विनंतीवरून मे. कोर्टानें सदरचा दावा आर्बिट्रेशन ॲक्ट १९४० चें कलम २३ अन्वयें लवादाकडे सोंपविला आहे. सिंडिकेटनें आपणांतर्फे लवाद म्हणून श्री. मा. म. गुप्ते, एम्. ए., एलएल. बी., यांची व प्रतिवादीनें त्यांचेतर्फे लवाद म्हणून श्री. अ. श्री. देशपांडे बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, यांची नियुक्ति केली आहे. सदरील दोन्ही लवादांनीं सातारा येथील श्री. शंकर हरी साठे, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, यांची अंपायर म्हणून नियुक्ति केली आहे. लवादाचा निर्णय अद्यापि व्हावयाचा आहे.

अहवालाचे वर्षी श्री. करमसी जेठाभाई सोमय्या व त्यांचे चिरंजीव श्री. शांतीलाल करमसी सोमय्या यांनीं एकूण रु. ५,४४,७९५-०० किंमतीचे शेअर्स वर्ग करून मिळणेकरितां कंपनीकडे पाठविले होते. संचालक मंडळानें सदरचे शेअर्स वर्ग करून देण्याचें नामंजूर केलें. त्यानंतर सदरील दोन्ही गृहस्थांनीं १९५६ चे कंपनी कायद्याचें कलम १११ अन्वयें मध्यवर्ती सरकारकडे संचालक मंडळाचे सदरचे निर्णयाविरुद्ध अपिलें दाखल केलीं. परंतु मध्यवर्ती सरकारनें सदरचीं दोन्हीं अपिलें नामंजूर केलीं. श्री. रणछोडदास शामजी खिराणी यांनीं त्यांचें अपील मध्यवर्ती सरकारनें दि. ३१-७-१९५७ ला फेटाळल्या नंतर ना. मुंबई हायकोर्टांत कंपनीचे शेअर रजिस्टर दुरुस्त करणेसाठी १९५६ चे कंपनी कायद्याचें कलम १५५ अन्वयें अर्ज दाखल केला होता. परंतु तो अर्ज फेटाळण्यांत येऊन अर्जदारानें त्यास सल्ला मिळेल त्याप्रमाणें एक अगर अनेक दावे दाखल करावे असा ना. हायकोर्टानें हुकूम केला.

संचालक मंडळानें जून १९५७ मध्यें पांच लक्ष रुपये दर्शनी किंमतीचे शेअर्स विक्रीस काढण्याचें ठरविलें. परंतु संचालक मंडळास याप्रमाणें शेअर्स विक्रीस काढण्याचा अधिकार नसल्यानें शेअरविक्री करूं नये म्हणून सिंडिकेटला मनाई करणेबद्दल दोन भागीदारांनीं सिंडिकेटविरुद्ध दोन दावे मे. सिव्हिल जज्ज, सीनिअर डिव्हिजन पुणें, यांचे कोर्टांत दाखल केले. परंतु मे. कोर्टानें सदरचे दोन्ही दावे निकाली काढून टाकले. त्यापैकी एका वादीनें सदर निर्णयाविरुद्ध ना. मुंबई हायकोर्टांत अपील दाखल केलें असून ना. मुंबई हायकोर्टानें पहिलें अपील नं. ५६२ सन १९५८ चे कामीं सिंडिकेटला तात्पुरता मनाई हुकूम बजावला असून त्या अपिलाचा निकाल होईपावेतों शेअर-मंजुरीबाबत संचालक मंडळाचा दि. १२-५-५७ चा ठराव व दि. १-६-५७ ची नोटीस यांची तामिली करूं नये असें कळविलें आहे. त्या अपिलाचा निकाल अद्यापि व्हावयाचा आहे. या शेअर-विक्रीपोटीं जमा झालेली रक्कम सिंडिकेटनें बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें २, मध्यें कॉलमनी डिपॉझिट खातें उघडून ठेविलें आहे. सरकारनें मंजूर केलेल्या दराप्रमाणें सदर रकमेवर व्याज मिळेल. संचालक मंडळानें दि. १ जून १९५७ च्या नोटिशींत व्याजाचे रकमेबाबत निर्दिष्ट केलेल्या अटींप्रमाणें व्याजाची संपूर्ण तरतूद केली आहे.

गतवर्षी म्हटल्याप्रमाणें नवीन पक्की गोडाउन बांधणेचा कार्यक्रम अहवालाचे वर्षी पुरा करण्यांत येऊन सिंडिकेटला तीन नवीन गोडाउन्स झाली असून त्यांचें एकूण क्षेत्रफळ सुमारें ५८,००० चौरस फूट आहे व त्यांत सुमारें १,००,००० पोतीं सांठवितां येतील.

अल्कोहोल सांठविण्याची सोय नसल्यानें डिस्टिलरीचें कामकाज सिंडिकेटला थांबवावें लागलें. डिनेचर्ड स्पिरिटला मागणीहि बेताचीच असल्यानें व्यापाऱ्यांनीं उचललेलें अल्कोहोलहि बेतानेंच खपलें. त्याची आलेली किंमतहि फारच थोडी होती. अल्कोहोलला देशांतील विक्रीसाठी अनुकूल बाजार होईपर्यंत अगर परदेशचा बाजार मिळेपर्यंत अल्कोहोलचें संपूर्ण उत्पादन करणें श्रेयस्कर होणार नाहीं असें संचालक मंडळास वाटतें. अल्कोहोलच्या निर्यातीचे योग्य किंमतीचे विक्रीसाठी कांहीं लोकांबरोबर संचालक मंडळ विचार-विनिमय करीत असून त्याबाबतचे करार पूर्ण झाल्यावर डिस्टिलरी पुन्हां चालू करतां येईल.

मुंबई इंडस्ट्रिअल कोर्टाच्या निवाड्याप्रमाणें सेवकवर्गास द्याव्या लागणाऱ्या ग्रॅच्युइटीच्या देण्यासाठी संचालक मंडळानें रु. १,५०,००० ची तरतूद केली आहे. ग्रॅच्युइटीची एकूण रक्कम किती होईल हें ठरवितां येण्यासारखें नसल्यानें या ताळेबंदांत यासाठी काँटिंजंट लायबिलिटी म्हणून दाखविली आहे.

साखर-विक्रीच्या सरकारी धोरणामुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणी अहवालाचे वर्षींहि मागील वर्षाप्रमाणेंच कायम होत्या. ताळेबंदाचे तारखेस साखरेवरील सुमारें २५ लक्ष रुपयांची अबकारी कराची रक्कम सोडून ६१ लक्ष रुपयांहून जास्त किंमतीची साखर कंपनीकडे शिल्लक होती. सबब एवढा मोठा दरमहाचे दरमहा वाढत जाणारा साखरेचा सांठा शिल्लक राहिल्यानें त्या बाबतींत आर्थिक तरतूद करणें जरूर होतें. या संबंधांत दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे अध्यक्ष, संचालक मंडळ व अधिकारीवर्ग यांनीं केलेल्या आर्थिक सहकार्याबद्दल व मदतीबद्दल संचालक मंडळानें आभार मानले आहेत.

---

### किर्लोस्कर ब्रदर्स लि. १०% चें करमाफ डिव्हिडंड

किर्लोस्कर ब्रदर्स लि. नें ३१ जुलै, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें २ कोटी रु. मालाच्या विक्रीपासून मिळविले. गुंतवलेल्या रकमांवर व बँकांतील ठेवींवर १,१०,९७६ रु. व्याज मिळालें. सर्व खर्च वजा जातां घसारा, डेव्हलपमेंट, रिबेट, कर, व बोनस ह्यांची तरतूद करून ५,६६,७३३ रु. नफा उरला. त्यांतून २,२७,३१० रु. जनरल रिझर्व्हमध्यें घालण्यांत आले; ६०,००० रु. रिफर्ड टॅक्सेशन रिझर्व्हमध्यें व ५०,००० रु. रिहॅबिलिटेशन रिझर्व्हमध्यें घालून २,२६,९०० रु. चा विनियोग १०% करमाफ डिव्हिडंड देण्याकडे करण्यांत आला.

खरी गरज कोणती ?

# तिसरी पंचवार्षिक योजना

## उद्दिष्टें, तीं साध्य होण्याचे मार्ग व गृहीत गोष्टी

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी पैसा उपलब्ध करण्याचा विचार करूं जातां एकूण कर उत्पन्नांत ग्रामीण विभागाचा वांटा वाढविण्याची आवश्यकता आहे. या लेखांत देशांत अधिक पैसा विकास कार्यासाठी उपलब्ध करण्याचे आणखी कांहीं उपाय डॉ. के. एस. राज ह्यांनीं सुचविले आहेत.

ग्रामीण विभागाप्रमाणें शहरी विभागांतहि, विशेषतः दरवर्षी ६००० ते २५,००० रु. उत्पन्न असलेल्यांच्या बाबतींत, जादा कर घेण्यास वाव आहे. या म्हणजे स्थूलमानानें वरिष्ठ मध्यमवर्गीय म्हणतां येईल अशा या वर्गातील लोकांकडून प्रत्यक्ष कराद्वारें मिळणाऱ्या उत्पन्नाचें प्रमाण इतर देशांतील या वर्गाशीं तुलना करतां बरेंच कमी आहे. राजकीय पुढारी, आमदार, खासदार, कर चौकशी मंडळाचे सदस्य व वरिष्ठ सरकारी मुलकी नोकरवर्ग समाजाच्या याच थरांतून येत असल्यानें कदाचित् या उत्पन्न गटांतील लोकांवर आकारल्या जाणाऱ्या करांच्या बाबतींत कांहीं नकळतच प्रभाव पडत असतो.

त्याचप्रमाणें शहरी विभागांत चैनीसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवरहि अधिक कर लादण्याची आवश्यकता आहे. तथापि या बाबतींतील उत्पन्नांत वाढ व्हावयास पाहिजे असेल तर प्रथम करविषयक कारभार व करवसुली यांत खरी सुधारणा झाली पाहिजे.

करवसुलीची व्यवस्था चोख नसली तर कर आकारणीचें धोरण प्रगतीपर असलें तरीहि करचुकवेपणाचे प्रकार वाढतात. या बाबतींत आपण अमेरिकेंतील तज्ज्ञांचा सल्ला घेण्यास हरकत नाहीं. त्या देशांत कुप्रसिद्ध डाकू अल् कपोन यास खुनाच्या आरोपावरून नव्हे तर प्राप्तीकर चुकविण्याच्या आरोपावरून शिक्षा झाली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जपाननेंहि या बाबतींत अमेरिकेचा सल्ला घेऊन प्राप्तीकरापासून होणाऱ्या उत्पन्नांत बरीच भर घातली आहे.

### आयुर्विमा

विकास कार्यासाठी आर्थिक साधनांत वाढ करण्याचें आणखी एक प्रचंड व बव्हंशी न हाताळण्यांत आलेलें एक क्षेत्र म्हटलें म्हणजे आयुर्विमा क्षेत्र. कांहीं दिवसांपूर्वी म्हणजे पंतप्रधान श्री. नेहरू यांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्तानें राजस्थानांतील एका समाज विकास गटानें सुमारें १२५ खेड्यांतून ७० लाख रुपये मूल्याचे आयुर्विमे उतरविण्याचें लक्ष्य ठरविलें असतां प्रत्यक्षांत १·४ कोटी रुपये मूल्याचे आयुर्विमे उतरविण्यांत आले. ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें (उत्तर विभाग) हा एक प्रयोग करून पाहिला व तो यशस्वीहि झाला. अशाच प्रकारें भारतांतील सुमारें ५ लाख खेड्यांतून ४,००० कोटी रु. मूल्याचीं विमापत्रें देण्याचें लक्ष्य ठरविल्यास तें अवास्तव होणार नाहीं. अशा विमापत्रांच्या हप्त्यांद्वारें दरवर्षी निश्चितपणें सुमारें २०० कोटी रुपयांचें उत्पन्न होऊं शकेल.

या देशांत जीवनोपयोगी गोष्टींवर होणाऱ्या खर्चापैकी समारंभांवर ग्रामीण विभागांत सुमारें ६ टक्के, तर शहरी विभागांत ४ टक्क्यांवर खर्च होत असल्याचें आढळून आलें आहे. पण, समारंभ यांवर होणारा खर्च निम्म्यानें तरी कमी करून त्यायोगें उरणारी रक्कम अल्प बचतींत गुंतविण्याकडे लोकांचीं मनें वळविण्यासाठी देशव्यापी मोहीम सुरू करणें शक्य आहे.

### धोरणाप्रमाणें अंमलबजावणी पाहिजे

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत रेल्वे, पोलाद कारखाने, खत कारखाने यांसारख्या सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांतून मिळणाऱ्या नफ्यांमधूनहि विकास कार्यासाठी सुमारें १ हजार कोटी रुपये मिळतील असा अंदाज आहे. घाऊक प्रमाणावर सरकारनें व्यापार केल्यावर त्यास नफा मिळूं शकेल हें तांत्रिक दृष्ट्या ठीक असलें तरी त्यावर फारसें विसंबून राहणें सूज्ञपणाचें ठरणार नाहीं. सरकारी व्यापारामुळें शेतमालाच्या किंमती स्थिर राहिल्या आणि सावकारी करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या पिळवणुकींतून शेतकऱ्यांची सुटका होऊन त्यांस संरक्षण मिळालें तरी त्यावर समाधान मानणेंच ठीक पडेल.

शेतकी क्षेत्रांतील विकास कार्यक्रमांच्या यशावरच मुख्यत्वें देशांतल्या देशांतच योजनेसाठी जरूर तेवढा पैसा उभा करण्याच्या संकल्पाचें यश असतें, हें आपण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीबाबतींत पाहिलेंच आहे. या क्षेत्रांत आतांपर्यंत जें अपयश मिळालें त्यांस आतांपर्यंत तरी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मूलभूत उद्योगधंद्यांवर विशेष भर देण्यांत आला हें कारण नसून तत्वतः स्वीकारलेल्या धोरणांची व कार्यक्रमांची अंमलबजावणी होऊं शकली नाहीं हें कारण आहे. जमीन सुधारणेचे कार्यक्रम आणि शेतमालाच्या किंमती स्थिर ठेवण्याचें धोरण यांचा या बाबतींत प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल.

### शेतकी सुधारणेची गरज

अनेक शतकें पिळवणूक होत आल्यामुळें सुधारणेची स्वाभाविक तीव्रता नष्ट झालेली आहे. अशा क्षेत्रांत जमीन सुधारणेस फार महत्त्व आहे, तें केवळ मानसिकदृष्ट्याच नसून शेतकऱ्यानें पिकविलेल्या पिकांपैकी बराचसा भाग खंड म्हणून या अन्य सबबीखाली त्याच्या हातचा हिसकावून घेतला जात असतां त्यांत उत्पादन वाढ करावी अशी अपेक्षाहि बाळगतां येणार नाहीं म्हणूनहि आहे हें लक्षांत घ्यावयास हवें.

शेतमालाच्या किंमतींत होणाऱ्या चढउतारामुळेंहि शेतकरी निरुत्साहि बनतो. अन्नधान्याच्या किंमतींत होणाऱ्या चढउतारापेक्षा रोकड पिकांच्या किंमती बऱ्याच स्थिर असल्यानें गेल्या कांहीं वर्षांत व्यापारी पिकांच्या लागवडींत हळूहळू पण सतत वाढ होत आहे हें या दृष्टीनें सूचक आहे.

### चर्चा झाली; प्रगति नाहीं

शेतमालाच्या किंमती स्थिर ठेवण्याच्या कार्यक्रमासाठी सरकारनें प्रत्यक्ष खरेदी-विक्रीचा व्यवहार करून मागत नाहीं तर शेतमाल सांठवून ठेवण्यासाठी गुदामांचीहि आवश्यकता असते. गेल्या पंचवीस वर्षांत या संबंधांत बरीच चर्चा होऊनहि आणि कांहीं वर्षांपूर्वी वेअर-हाउसिंग कॉर्पोरेशनची स्थापना झाली असतांहि पहिल्या वा दुसऱ्या योजनेत या क्षेत्रांत कांहींच प्रगति झालेली नाहीं. यंदा भरपूर पीक येईल असा अंदाज असून त्यामुळें १९५३–५४ सालांतल्याप्रमाणें पुन्हां एकदां मोठ्या आशा निर्माण होतील व त्यामुळें किंमती खालीं येण्याची शक्यता आहे. पण त्याचबरोबर नेमक्या याच गोष्टीमुळें शेतकी उत्पादन वाढीच्या दीर्घ मुदतीच्या कार्यक्रमास हानि पोंचण्याचा संभव आहे.

प्रचलित राजकीय व सामाजिक चौकटींतहि अंतर्गत साधन-सामुग्रीची टंचाई ही कांहीं त्या मानानें व्यापक व कार्यक्षम अशा तिसऱ्या योजनेच्या आड येणारी बाब नाहीं असें या शक्याशक्यतेबाबतच्या पाहणीवरून दिसून येईल. या प्रश्नाकडे शास्त्रशुद्ध, प्रागतिक आणि आशावादी दृष्टिकोनांतून पाहण्याचीच काय ती गरज असून, त्याहिपेक्षा आंखलेले व स्वीकारलेले कार्यक्रम व धोरणें अंमलांत आणण्याचा निर्धार ही खरी गरज आहे.

### परकीय चलनाचा प्रश्न कठीण कां झाला ?

परकीय चलन उपलब्ध होण्याचा प्रश्न त्याहून कांहीसा थोडा कठीण असून, विशेषतः दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणींत आजपर्यंत ज्या चुका झाल्या व अपयश आलें त्यामुळें तर हा प्रश्न कठीण झाला आहे. अन्नधान्यांची आयात करण्यासाठी गेल्या दोन–अडीच वर्षांत बरेच म्हणजे सुमारें २६० कोटी रुपये किंमतीचें परकीय चलन खर्च झालें असून, आपणाला उत्पादन करतां येणें शक्य असलेल्या मालाचें उत्पादन भारतांतच करण्यासाठी आपण कार्यक्षम उपाययोजना करीपर्यंत आपणाला अन्नधान्याच्या आयातीसाठी अशीच रक्कम सतत खर्ची टाकावी लागेल. दुसरें म्हणजे, पहिल्या, तसेंच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ज्या अनेक उद्योगधंद्यांच्या उभारणीस परवानगी देण्यांत आली त्यांच्या बाबतींत प्राथमिक भांडवली खर्चासाठीच नव्हे तर त्याद्वारें तयार होणाऱ्या मालाच्या आयातीसाठीहि परकीय चलनाला सतत ओहोटी लागत आहे. रेयॉन, प्लॅस्टिक्स व सौंदर्यप्रसाधनें तयार करणारे धंदे इत्यादींचा यामध्यें समावेश होतो. यंत्रें तयार करणाऱ्या धंद्यांच्या प्रगतीचा वेग मंद आहे ही तर सर्वांत गंभीर घटना असून त्यामुळें देशांतच तयार होऊं शकली असती अशी यंत्रसामुग्री तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि आपणांला परदेशांतून आयात करावी लागणार आहे.

याचा मतितार्थ हाच कीं, (१) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यंत्रें तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांना पहिला क्रम दिला पाहिजे, (२) तसेंच, ह्या उद्योगधंद्यांत तसेंच, त्यांच्याशीं निगडित असलेल्या इतर उद्योगधंद्यांत गुंतविण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जादा परकीय चलनाची व्यवस्था केली पाहिजे.

### पोलाद–उत्पादनाचें महत्त्व

अशा धंद्यांसाठी मूलतःच आवश्यक असलेलें पोलाद देशांत पुष्कळ तयार होऊं लागलें म्हणजे यंत्रें तयार करणाऱ्या या धंद्यांसाठी विशेष जादा परकीय चलनाची गरज लागणार नाहीं. खरें म्हणजे एकूण ६०० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामुग्री तयार करण्यासाठी (हा आंकडा १९५७–५८ मध्यें परदेशांतून यंत्रसामुग्रीची व भांडवली मालाची आयात करण्यासाठी खर्च केलेल्या रकमेचा आहे.) इंजिनिअरिंग उद्योगधंद्यांत तेवढीच म्हणजे ६०० कोटी रुपयांची रक्कम गुंतविल्यास पुरेशी होईल. अर्थात् पोलादाच्या उत्पन्नांत आणखी वाढ करण्याचें बंद करून किंवा ग्राहकोपयोगी औद्योगिक मालाच्या उत्पादनास विशेष पायबंद बसेल असें करून यंत्रें तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांवर भर देण्याची चूक आपण तिसऱ्या योजनेच्या काळांत करतां कामा नये. पोलाद उत्पादनांत आणखी किमान ३० लक्ष टनांनीं वाढ करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उपाय योजण्यांत आले नाहींत तर पहिल्या पंचवार्षिक योजनेंत घडलेल्या चुकीचीच पुनरावृत्ति होईल व चौथ्या पंचवार्षिक योजनेंत पोलादाचा तुटवडा भासेल. ग्राहकोपयोगी औद्योगिक मालाच्या उत्पादनामुळें विकासशील अर्थव्यवस्थेंत चलन फुगवट्यास पायबंद बसतो व रोजगाराच्या अधिक संधि उपलब्ध होतात याचा विचार करतां त्यांनाहि तितकेंचा महत्त्व आहे.

### तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा खर्च

या आणि इतर गोष्टींचा विचार करतां तिसरी योजना ढोकळमानानें ९,००० ते १०,००० कोटी रुपये खर्चाची आखावी लागेल. ती पुरी करण्यासाठी १,५०० कोटी रुपयांहून अधिक परकीय साह्याची आवश्यकता पडणार नाहीं. ह्या परकीय साह्यापैकी देखील सुमारें ५०० कोटी रुपये आतांपर्यंत घेतलेल्या परकीय कर्जांच्या परतफेडीसाठीच लागतील.

### गृहीत गोष्टी

शेतकी क्षेत्रांत करण्यांत येणाऱ्या जादा प्रयत्नांमुळें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अन्नधान्याची आयात करावी लागणार नाहीं ही मुख्य गोष्ट येथें गृहित धरलेली आहे. तसेंच आणखीहि कांहीं गोष्टी गृहित धरण्यांत आल्या आहेत. त्या अशा :– (१) इंजिनिअरिंग उद्योगधंद्यांतील भांडवल गुंतवणुकीमुळें १९५७–५८ शीं तुलना करतां १९६०–६१ पर्यंत आपल्या यंत्रसामुग्रीच्या तसेंच भांडवली व इतर मालाच्या आयातींत सुमारें ३०० कोटी रुपयांची घट होईल. (२) निर्यातींत १९६५–६६ पर्यंत दरवर्षी सुमारें ७५ कोटी रुपयांची वाढ होईल. या गोष्टी साध्य झाल्यास तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत वर उल्लेखिलेल्या मर्यादेपर्यंत परकीय साह्य मिळालें तरी आपलें भागूं शकेल इतकेंच नव्हे तर या योजनेच्या अखेरीस आपल्या देण्याघेण्याचा विचार करतां शिलकीची परिस्थिति निर्माण होईल आणि त्यांतून आपल्याला त्यावेळेपर्यंत जमलेल्या परकीय देण्यांची हळूहळू परतफेड करतां येईल. देशांत झपाट्यानें वाढणाऱ्या लोकसंख्येचा (दरवर्षी अंदाजें २ टक्के) आणि भविष्य काळांत स्थिर व लोकशाहीधिष्ठित प्रगतीसाठी आवश्यक त्या परिस्थितीचा विचार करतां याप्रमाणें सुचविण्यांत आल्या इतक्या व्याप्तीची तिसरी पंचवार्षिक योजना आंखणें हें आपलें किमान उद्दिष्ट असलें पाहिजे.

---

**निर्यात मालाचें तरतें प्रदर्शन**—भारतामधील कांहीं उद्योगपतींनीं इंडिअन कौन्सिल फॉर फारेन ट्रेड ह्या संघटनेच्या सहकार्यानें भारतांत तयार होणाऱ्या व निर्यात होऊं शकणाऱ्या मालाचें एक तरतें प्रदर्शन फिरतीवर न्यावयाचें ठरविलें आहे. अशाप्रकारच्या मालाची मांडणी एका बोटीवर करण्यांत येणार असून ती बोट सीलोन, पूर्व–आफ्रिका व पश्चिम आशिआंतील राष्ट्रें ह्यांचा ९० दिवसांचा दौरा करणार आहे.

**आस्वान धरण बांधण्याचा करार**—इजिप्तमध्यें आस्वान येथें बांधण्यांत यावयाच्या धरणासाठी मदत देण्याचा करार गेल्या डिसेंबरमध्यें रशिआनें इजिप्तशीं केला होता. ह्या कराराला आतां सुप्रीम सोव्हिअटनें मान्यता दिली आहे. कराराप्रमाणें धरणाच्या कामासाठी व तांत्रिक साह्यासाठी म्हणून रशिआ इजिप्तला ४० कोटी रुबल्स कर्ज देणार आहे.

**शरावती खोरें योजना**—म्हैसूर राज्यांतील शरावती खोरें योजनेसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची गरज भागविण्याचें मध्यवर्ती सरकारनें कबूल केलें आहे. पाण्याच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारी भारतामधील ती सर्वांत मोठी योजना आहे व तीसाठी ५० कोटी रुपये लागणार आहेत. शरावतीवर तयार होणारी वीज सर्वांत स्वस्त पडेल असें म्हणतात.

## १९५९–६० चा रेल्वे अर्थसंकल्प

( आंकडे कोटी रुपयांत )

| | प्रत्यक्ष आंकडे १९५७-१९५८ | सुधारित अंदाज १९५८-१९५९ | अर्थसंकल्पीय अंदाज १९५९-१९६० |
|---|---|---|---|
| वाहतुकीपासून झालेलें एकूण उत्पन्न... | ३७९·७८ | ३९४·३८ | ४२२·०३ |
| सर्वसाधारण चालू खर्च ... | २६४·१८ | २७४·२२ | २८३·७१ |
| निव्वळ संकीर्ण खर्च ... | १२·५६ | १२·०३ | १७·६१ |
| घसारा राखीव निधींत जमा | ४५·०० | ४५·०० | ४५·०० |
| मार्ग वापरल्याबद्दल अन्य रेल्वेस दिलेली रक्कम ... | २६ | ·१० | ·११ |
| एकूण... | ३२२·०० | ३३१·३५ | ३४६·४३ |
| रेल्वेचें निव्वळ उत्पन्न ... | ५७·७८ | ६३·०३ | ७५·६० |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | ४४·४० | ५०·०३ | ५४·४१ |
| निव्वळ शिल्लक ... | १३·३८ | १३·०० | २१·१९ |

**उत्पादन कौन्सिलची स्थापना** — पश्चिम युरोपांतील कारखान्यांच्या उत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी भारतामधील अधिकाऱ्यांचें एक मंडळ तिकडे गेलें होतें. त्यांनीं केलेल्या शिफारशीप्रमाणें कानपूर येथें एका उत्पादन कौन्सिलची स्थापना करण्यांत येणार आहे. ह्यापूर्वी मद्रास, मुंबई, कलकत्ता व बंगलोर येथें अशीं कौन्सिलस् स्थापन करण्यांत आलीं आहेत.

## होळ नं. २ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड

**( मु. पो. होळ, ता. बारामती, जि. पुणें )**

मुंबई राज्य सरकारचे धोरणाप्रमाणें व शेतकरी बंधूंचे गरजेस अनुसरून सरकारचे मदतीनें सोसायटीनें मौजे होळ या गांवीं एक आधुनिक पद्धतीचें गोडाऊन बांधलें आहे. या गोडाऊनचें उद्घाटन रविवार दिनांक २२ फेब्रुवारी १९५९ या दिवशीं झालें. त्यानिमित्त सोसायटीनें व्हॉलिबॉल व हुतुतू वगैरे खेळांचे सामने ठेवले होते. या खेळांचे सामन्यांतून भाग घेण्याकरितां महाराष्ट्रांतील नांवाजलेले असे संघ येणार आहेत. खेळांचे सामन्यांचें उद्घाटन श्री. मुगुटराव साहेबराव काकडे (देशमुख) चेअरमन, पुणें जिल्हा स. ख. वि. संघ लि. यांचे हस्तें शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी १९५९ या दिवशीं सकाळीं ७–३० वाजतां झालें. गोडाऊनचा उद्घाटन समारंभ डॉ. ए. गू. शेख, रजिस्ट्रार, को. सोसायटीज्, ह्यांनीं दि. २२ रोजीं केलें.

**५ लाख रुपयांची देणगी** — इंडिअन मर्चंटस चेंबर ह्या संस्थेनें आर्थिक संशोधन करण्यासाठी एक संघटना स्थापन करण्याचें ठरविलें आहे. मुंबईतील सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं संघटनेसाठी ५ लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. देणगीमुळें संघटनेच्या कामाला चांगली चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४ [ टेलिफोन २७०९४

**भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिटा यांची वसुली माफक दरानें केली जाते.**

विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याहि शाखेंत मिळेल.

: शाखा :

फोर्ट, दादर, माहीम, वरळी, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

# * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ — प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ — कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०

खेळतें भांडवल ... ... रु.५८,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

## भाडेकऱ्याला काढून टाकण्याची डिक्री

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

कालीदास भवन या इसमाचा भगवानदास सकलचंद हा इसम भाडेकरू असून जुलै १९५४ पासून त्याचेकडे भाडें थकल्यामुळें कालीदास भवननें ता. ५ सप्टेंबर १९५४ रोजीं त्याचेवर नोटीस बजावून घर सोडून जाण्यास सांगितलें. नोटीस देण्याला देण्यांत आलेलीं दोन कारणें अशीं होतीं कीं, भाडेकरूकडे भाडें थकलेलें आहे आणि त्यानें आपली जागा पोटकिरायानें दुसऱ्यास दिली आहे. थकलेलें भाडें वसूल करण्याकरितां आणि भाडेकऱ्यास घरांतून काढून टाकण्याकरितां मालकानें ता. ६ जानेवारी १९५५ रोजीं दावा आणला. दाव्याच्या सुनावणीची पहिली तारीख २६ जून १९५५ ठरविण्यांत आली. ता. २३ ऑगस्ट १९५५ रोजीं भाडेकऱ्यानें ११२ रुपये कोर्टांत जमा केले आणि ता. २६ ऑगस्ट १९५५ रोजीं त्यानें पुन्हां १२५ रुपये कोर्टांत जमा केले. या दोन रकमांची बेरीज ता. २६ ऑगस्ट रोजीं भाडेकऱ्याकडून जेवढें येणें निघत होतें त्यापेक्षा जास्त होत होती. ता. ३१ ऑगस्ट १९५५ रोजीं अव्वल कोर्टानें अशी डिक्री दिली कीं, सप्टेंबर १९५१ पर्यंतचें थकलेलें भाडें ३० सप्टेंबरच्या अगोदर जर भाडेकऱ्यानें कोर्टांत जमा केलें तर भाडेकऱ्याला काढून टाकण्यासंबंधीची जी डिक्री कोर्ट देत आहे तिची अंमलबजावणी होऊं नये आणि भाडेकऱ्याच्या ताब्यांत असलेली जागा पूर्ववत् त्याच्याच ताब्यांत रहावी. या निकालाविरुद्ध कालीदास भवननें डिस्ट्रिक्ट कोर्टांत अपील केलें. परंतु तें अपील नामंजूर करण्यांत आल्यामुळें कालीदास भवन यानें हायकोर्टांत रिव्हिजन-अर्ज केला.

मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या क. १२ (१) खालीं जोंपर्यंत भाडेकरी भाडें देत आहे अथवा देण्यास तयार आहे आणि मक्त्याच्या शर्ती तो पाळत आहे तोंपर्यंत त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्ट देऊं शकत नाहीं. परंतु या शर्ती जर भाडेकऱ्यानें पाळल्या नाहींत तर त्याला त्या जागेवरून काढण्याचा हुकुमनामा कोर्टानें दिलाच पाहिजे असें नाहीं. तो हुकुमनामा द्यावयाचा किंवा नाहीं हें कोर्टाच्या मर्जीवर अवलंबून राहील क. १२ (३) (अ) खालीं असें म्हटलें आहे कीं, सहा किंवा जास्त महिन्यांचें भाडें जर थकलें असेल तर मालक भाडेकऱ्याला नोटीस देऊं शकेल आणि नोटीस दिल्यापासून एक महिन्याचे आंत जर भाडेकरी नोटिशींत दिल्याप्रमाणें वागला नाहीं तर त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्ट देईल. कलम १२ (३) (ब) चा आशय पुढीलप्रमाणें आहे—

"भाडेकऱ्याला काढून टाकण्याकरितां आणलेल्या दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या तारखेस अथवा कोर्ट ठरवील त्या तारखेस जर भाडेकरी भाडें देईल आणि दाव्याचा निकाल लागेपर्यंत तें भाडें नियमितपणें देणें चालू ठेवील आणि दाव्याचा खर्च देईल तर त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्ट देणार नाहीं."

कलम १२ (३) (अ) आणि १२ (३) (ब) मध्यें असा फरक आहे कीं, क. १२ (३) (अ) मध्यें दिलेल्या शर्ती जर भाडेकऱ्यानें पाळल्या नाहींत तर मालकाच्या बाजूनें कोर्टानें हुकुमनामा दिलाच पाहिजे. असें बंधन कलम १२ (३) (ब) मध्यें नाहीं. कलम १२ (३) (ब) मध्यें दिलेल्या शर्ती जर भाडेकऱ्यानें पाळल्या नाहींत तर त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्टानें दिलाच पाहिजे असें नाहीं. तें कोर्टाच्या मर्जीवर अवलंबून राहील. परंतु जर भाडेकऱ्यानें त्या शर्ती पाळल्या तर त्याला काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्ट देणार नाहीं. तसेंच क. १२ (३) (ब) खालीं थकलेलें भाडें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्याच तारखेस दिलें पाहिजे असें नाहीं. कायद्याचा हेतु असा आहे कीं, थकलेलें भाडें दाव्यांतील अंतिम निकालापूर्वी दिलें गेलें पाहिजे. दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या तारखेस भाडेकऱ्यानें भाडें द्यावें अथवा कोर्टाच्या परवानगीनें कोर्ट ठरवून देईल त्या तारखेस तें भाडें त्यानें द्यावें. तसेंच दाव्यांतील अंतिम निकाल होईपर्यंत तें भाडें त्यानें नियमितपणें देणें चालू ठेवलें पाहिजे.

प्रस्तुत मामल्यांत भाडेकऱ्यानें दाव्यांतील अंतिम निकालापूर्वीच सर्व थकलेलें भाडें दिलें आहे. हें भाडें त्यानें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्याच तारखेस दिलें नाहीं हें खरें. तसेंच तें भाडें देण्याची तारीख ठरविण्याकरितां त्यानें कोर्टाला अर्जहि केला नाहीं आणि कोर्टानें ती तारीख ठरविलीहि नाहीं. परंतु दोनदां जमा केलेलें भाडें जेव्हां कोर्टानें स्वीकारलें तेव्हां कायद्याच्या दृष्टीनें थकलेलें भाडें त्या तारखांना देण्याची परवानगी कोर्टानें भाडेकऱ्याला दिली असें समजलें पाहिजे. तेव्हां क. १२ (३) (ब) मधील शर्ती भाडेकऱ्यानें पाळल्या असें समजलें पाहिजे आणि म्हणून त्याला त्या जागेवरून काढून न टाकण्याचा असिस्टंट जज्जाचा निकाल बरोबर होता असा निकाल देऊन हायकोर्टानें रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला.

#### सारांश

मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या कलम १२ (३) (ब) खालील शर्ती जर भाडेकऱ्यानें पाळल्या नाहींत तर त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्टानें दिलाच पाहिजे असें नाहीं. तसेंच दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्याच तारखेस थकलेलें भाडें भाडेकऱ्यानें दिलें पाहिजे असें नाहीं. दाव्यांतील अंतिम निकालापूर्वी जरी त्यानें तें भाडें दिलें तरी चालेल. त्याप्रमाणें जर त्यानें तें भाडें दिलें तर त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा हुकुमनामा कोर्ट देणार नाहीं.

—न्यायबोध, फेब्रुवारी १९५९

---

### पुरोहित क्रिकेट सामने

पूना बँकर्स असोसिएशनमार्फत प्रतिवर्षी भरविण्यांत येणाऱ्या पुरोहित बँक क्रिकेट टूर्नामेंटचे उपान्त्य सामने दि. १६ रोजीं होऊन त्यामध्यें युनायटेड कमर्शिअल बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया हे संघ विजयी ठरले. सेंट्रल बँकेतर्फे श्री. माने यांनीं विनबाद ११६ धांवा काढल्या. श्री. देगांवकर यांनीं स्टेट बँकेतर्फे ९२ धांवा काढल्या. (सेंट्रल बँक २२९ – माने विनबाद ११६, जोशी ४१, विजयी विरुद्ध स्टेट बँक ऑफ इंडिया १४७ – देगांवकर ९२). पु. शं. वैद्य हॅट्रिक ५ विकेट १५ धांवांमध्यें).

**दिल्लींत स्त्री बस-कंडक्टर**—दिल्ली कॉर्पोरेशन बसमधील कंडक्टरांच्या जागीं स्त्रियांची नेमणूक करण्याचा विचार करीत आहे. कॉर्पोरेशनच्या वाहतूक-समितीच्या अध्यक्षांच्या मतानें बसवर गोळा होणारा गल्ला त्यामुळें गळणार नाहीं आणि स्त्री-कंडक्टरांच्यामुळें उतारूंच्या वर्तनांत इष्ट असा फरक पडण्याचा बराच संभव आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.